Vol. IX
Number-6
ISSN 2319-8265
(Special Issue) January, 2018

EDUCATION TIMES

A Multidisciplinary International Peer Reviewed Journal

APH PUBLISHING CORPORATION

समाजातील वृद्धांच्या समस्या आणि उपाय

डॉ. अनुराधा एम. खाडे*

प्रस्तावना

भारतीय समाजात संयुक्त कुटुंबात विघटन ,व्यक्तिवादी विचार व अर्थव्यवस्थेतील बदलातून उद्भवलेल्या समस्यांपैकी वृद्धांची समस्या ही एक आहे मानव हा नैसर्गिक प्रक्रियेतून जात असतो. प्रत्येक व्यक्तीला बालपण तारुण्यपण आणि म्हातारपण या तीन अवस्था तून जावेच लागते. 14 ते 16 वर्षाचे बालपण निघून गेल्यावर व्यक्ती तारुण्यावस्थेत प्रवेश करतो आणि त्यानंतर व्यक्ती वार्धक्याकडे झुकतो. वृद्धत्व ही मानवी जीवनातील एक अवस्था आहे वर्तमान काळात वृद्धांच्या समस्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. वृद्धावस्थेत व्यक्ती हा मानसिक सामाजिक आर्थिक आधार मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो.थोडा पूर्वीच्या कालखंडाचा विचार केल्यास भारतातील कुटुंब पद्धती ही संयुक्त पद्धतीचे असल्यामुळे वृद्धांची वाईट अवस्था निर्माण झाली नव्हती ,परंतु औद्योगिकीकरण नागरीकरण आणि आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबाचा ह्रास होऊन विभक्त कुटुंब पद्धतो निर्माण झाले आहे आणि वृद्धांच्या विविध समस्या निर्माण झाल्या. वृद्धावस्था ही एक अशी अवस्था आहे की ज्यामध्ये व्यक्तीचे वय वाढत जाते ,त्याचबरोबर व्यक्ती असक्षम होत जातो आणि परावलंबित्व वाढत जाते. वृद्धावस्था हा जीवनाचा अंतिम टप्पा असतो आणि म्हणूनच शरीर या टप्प्यात जीर्ण व्हायला लागल्यामुळे अनेक रोग आणि कष्ट सहन व्यक्ती जखडून जातो .या वयामध्ये व्यक्तीची शारीरिक शक्ती कमी व्हायला लागते व्यक्ती अनेक रोगांचा शिकार बनतो आणि म्हणूनच या वयातील व्यक्तींचे कुटुंबीय आपल्या वृद्धांना बोझ समजायला लागतात. त्यांना शारीरिक मानसिक त्रास देतात आणि त्यांची व्यवस्था वृद्धाश्रमांमध्ये करून दिली जाते.

आज आपल्या भारतामध्ये वृद्धांच्या समस्या निर्माण होण्याची विविध कारणे आहेत

१. **संयुक्त कुटुंबाचे विघटन:** संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात येऊ लागली आहे .कुटुंबाचा लहान आकार ,जागेचा प्रश्न ,स्त्रियांनी अर्थार्जन करणे ,व्यक्तीचा व्यक्तिवादी दृष्टिकोन इत्यादी कारणामुळे कुटुंबात जास्त माणसे नकोशी झाली .त्यामुळे कुटुंब विघटित होऊ कुटुंबामध्ये वृद्धांची उपेक्षा व हेळसांड होऊन वृद्धांना अडचणीचे समजले जाऊ लागले.

२. **औद्योगीकरण:** औद्योगीकरणाने जाती पद्धती, कौटुंबिक आदर्श ,कुटुंबाची कार्य याबाबतीत झपाट्याने बदल झाले .मानवी श्रमा ऐवजी यांत्रिक श्रमाचे साहाय्य घेण्यात आले उत्पादनाचे केंद्र कुटुंब न राहिल्याने वृद्धांच्या अनुभवास ज्ञानास किंवा व्यवसाय भरभराटीस आणण्यासाठी केलेल्या त्यागाची किंमत राहिली नाही.

३. **नागरीकरण:** भारतात वृद्धांच्या समस्या ग्रामीण व नागरी या दोन्ही समुदायात आढळत असली तरी नागरी समुदायात ही समस्या अधिक तीव्र स्वरूपात आढळते. नगरातील जीवन अतिशय गतिशील

*सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, स्व. नि. पा. वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लाखनी, जि. भंडारा. (म.रा.)

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N.P.W. College, Lakhani
Ref. No.
Dt.

२. वृद्धांसाठी दिन केंद्रे: वृद्धांसाठी दिन केंद्रे हा देखील एक चांगला उपक्रम आहे .वृद्धाश्रमात वृद्धांची चांगली काळजी घेतली जाते ,असे असले तरी वृद्धाश्रमातील वृद्ध हे कौटुंबिक वातावरणापासून वंचित राहतात .त्यांनी कौटुंबिक वातावरणाला पारखे होऊ नये. या दृष्टीने दिन केंद्रे ही अतिशय महत्वाची आहेत.

३. निवृत्ती वेतन आणि भविष्यकालीन निर्वाह निधी: वृद्धावस्थेतील आर्थिक परावलंबन दूर करण्याच्या दृष्टीने निवृत्तीवेतन आणि भविष्यकालीन निर्वाह निधी विशेष महत्त्व आहे. भारत शासनाने कायदा करून निवृत्तीवेतन भविष्यकालीन निर्वाह निधी बोनस अनुग्रह याची तरतूद वृद्धांसाठी केली आहे.

४. अन्य सवलती: महाराष्ट्र शासनाने वृद्धांकरिता 1 जानेवारी 1996 पासून 65 वर्ष पूर्ण झालेल्या वृद्धांना एसटी भाड्यामध्ये 50 टक्क्यांची सवलत सुरू केली आहे. तसेच इंडियन एअरलाईन्सच्या प्रवासात प्रवास भाड्यामध्ये पन्नास टक्के सूट आहे. अडीचशे किमी पेक्षा जास्त अंतरावरील प्रवासातील द्वितीय वर्गाकरिता रेल्वे भाड्यामध्ये पन्नास टक्के सूट आहे. इन्कम टॅक्समध्ये विशिष्ट सवलत देण्यात आली आहे .काही हॉस्पिटल मध्ये सुद्धा वृद्धांना मोफत औषधोपचार केला जातो.

उपाययोजना

१. वृद्धावस्थेतील वृद्धांची जबाबदारी मुलांनी योग्य पद्धतीने सांभाळावी.
२. वृद्धांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा.
३. वृद्धांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात यावी.
४. वृद्धांना देण्यात येणाऱ्या निवृत्ती वेतनात वाढ करण्यात यावी.
५. वृद्धांसाठी साठी वृद्ध कल्याण कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात यावी.
६. वृद्धांची सेवा करण्यासाठी विविध संघटनांनी सहभागी व्हावे.
७. वृद्धत्व हे प्रत्येक मानवी जीवनातील घटना आहे याची सर्वांना जाणीव करून द्यावी.
८. राष्ट्रीय आरोग्य सेवा कायद्याअंतर्गत बुद्धांना भरपूर प्रमाणात आरोग्य सेवा दिली जावी.
९. वृद्धांना सामाजिक उपक्रमात जाणीवपूर्वक सहभागी करून त्यांचा एकांतवास घालवावा.
१०. वृद्धांच्या संदर्भात गरीब–श्रीमंत असा भेदभाव करण्यात येऊ नये.

संदर्भ ग्रंथ सूची

१. भारतातील सामाजिक समस्यारू प्रा. रा.ज .लोटे, पिंपळापुरे पब्लिशर्स .नागपूर.
२. भारतीय सामाजिक संरचना व समस्या: डॉ. प्रदीप आगलावे, पिंपळापुरे पब्लिशर्स .नागपूर.
३. भारतीय सामाजिक समस्यारू डॉ. भा.की. खडसे
४. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या: डॉ. सुनील, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N.P.W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref. No.
Dt.